# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०४/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## ट्रॅक्टर व मोटरसायकलचा भीषण अपघात ०१ ठार ०१ जखमी

**पोस्टे मौदा:–** अंतर्गत मौजा मारोडी मौदा येथे दिनांक २३/०४/२०२४ रोजी यातील फिर्यादी नामे– शरद दिवाळू ठोसरे, वय २६ वर्ष, रा. मारोडी ता. मौदा याची पॅशन गाडी क्र. एम एच–४०/ए पी ६०२५ वर गावातील रोहीत डांगरे व मागे योगेश भोयर असे धानला पांदन रोडने मारोडी गावामध्ये येत असता योगेश भोयर याच्या घराजवळ फिर्यादीच्या मोटार सायकलच्या मागे मागे येणाऱ्या राजु ठोंबरे याने त्याचे ताब्यातील हिरवट पोपटी रंगाचा इंडोफार्म ट्रॅक्टर ट्रॉलीसह भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला मागेहुन धडक दिली तेव्हा फिर्यादी व गाडी चालवत असलेला योगेश भोयर डाव्या बाजुला रोडवर पडले व मोटरसायकलवर मध्ये बसलेला रोहीत डांगरे हा रोडच्या उजव्या बाजुला रोडवर पडला, तेव्हा रोहीत डांगरे याच्या अंगावरुन ट्रॉलीसह ट्रॅक्टर गेला व तो गंभीर जखमी झाला. फिर्यादी रोडवर पडल्यामुळे पाठीच्या डाव्या पासल्या फॅक्चर आहेत. तसेच डाव्या कानाला जखम झाली व डाव्या हाताच्या काखेजवळ मुका मार लागला तेव्हा लोकांनी फिर्यादीला व त्याचा मित्र रोहीत डांगरे याला दवाखान्यात नेले रोहीत डांगरे याला ग्रामीण रुग्णालय मौदा येथिल वैद्यकीय अधिकारी यांनी मेयो हॉस्पीटल नागपुर करीता रेफर केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. फिर्यादीचा उपचार ब्लेस हॉस्पीटल मौदा येथे सुरु आहे सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम २७९, ३३८, ३०४(अ) भादवि. सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर अपघाताचे गांभीर्य लक्षात घेता मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांचे आदेशान्वये उपविभागीय पोलिस अधिकारी रमेश बरकते यांनी गुन्ह्याच्या घटनास्थळाला भेट दिली. अपघाताच्या कारणाबाबत घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील साक्षीदारांना विचारपूस केली असता धानला पांदण रोडने मारोडी गावातील योगेश भोयर याच्या घराजवळील वळणावर राजू ठोंबरे या ट्रॅक्टर चालकाने मोटरसायकलला पाठीमागून जोरात धडक दिल्याने अपघात झाल्याचे दिसून येत आहे. चौकशीत घटनास्थळावर येणारा रस्ता हा कोणत्याही रेती घाटावरून येत नसल्याचे दिसून आले. तसेच अपघातातील मोटरसायकल ही आरोपी राजू ठोंबरे याची असल्याची व अपघातातील जखमी हे आरोपीकडे मजूर म्हणून काम करत असल्याची माहिती मिळाली. आरोपी राजू ठोंबरे याचे शेतातील घर बांधकाम चालू असून तेथे अंदाजे एक ब्रास रेती असल्याने त्याबाबत तहसीलदार मौदा यांना सदरील रेती वैध अथवा अवैध आहे याबाबत चौकशी करून अहवाल मागितला आहे. गुन्ह्यातील वाहन जप्त केले असून आरोपी राजू ठोंबरे त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक रवाना केलेले आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर